# उच्च न्यायालय, मुंबई
## शिपाई/हमाल पदाकरीता निवड प्रक्रिया २०२३

**संदर्भ :—** १. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील “शिपाई/हमाल” पदाची जाहिरात दिनांक २१/०३/२०२३.

२. मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर “शिपाई/हमाल” पदाकरीता शारीरिक क्षमता आणि विशेष अर्हता परीक्षेसाठी पात्र असलेल्या १०२२ उमेदवारांची प्रसिध्द करण्यात आलेली यादी दिनांक ०६/०८/२०२४.

## सुचना

उपरोक्त संदर्भ क्रमांक २ च्या अनुषंगाने १०२२ पात्र उमेदवारांना कळविण्यात येत आहे की, त्यांनी “शिपाई/हमाल” या पदाकरिता नियोजित केलेल्या **शारीरिक क्षमता आणि विशेष अर्हता** परीक्षेसाठी (Physical Fitness and Special Skill Test), उच्च न्यायालय, अपील शाखा, हुतात्मा चौक, फोर्ट, मुंबई—४०० ०३२ या स्थळी गेट नं.४ द्वारे **दिनांक १८ ऑगस्ट, २०२४** रोजी ठीक **सकाळी ०९.००** वाजता स्वखर्चाने उपस्थित रहावे.

वरील नमूद उमेदवारांनी ओळखीच्या पुराव्यासाठी स्वत:चे आधार कार्ड किंवा निवडणूक आयोगाचे ओळखपत्र किंवा पॅन कार्ड किंवा वाहन चालविण्याचा परवाना इत्यादी पैकी किमान कोणतेही एक मूळ ओळखपत्र आणणे अनिवार्य आहे. तसेच नाव बदललेले असल्यास उमेदवाराने राजपत्राची प्रत किंवा त्यासंबंधीचे कागदपत्र प्रवेशपत्रासोबत आणणे अनिवार्य आहे.

तसेच उमेदवारांनी शारीरिक क्षमता आणि विशेष अर्हता परीक्षेसाठीचे (Physical Fitness and Special Skill Test) प्रवेशपत्र (Hall Ticket/ Admit Card) मुंबई उच्च न्यायालयाच्या अधिकृत संकेतस्थळावरून https://bombayhighcourt.nic.in **दिनांक** १४/०८/२०२४ पासून डाउनलोड करावे व परीक्षेच्यावेळी सोबत आणावे.

सर्व संबंधित उमेदवारांनी याची नोंद घ्यावी.

**सही/—**

**दिनांक : १२ ऑगस्ट, २०२४**

**(सत्यनारायण रा. नावंदर)**
**प्रबंधक (कार्मिक)**